
0 9 APR 2021 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'सारथी'च्या निबंधकांची विद्यापीठास भेट



कोल्हापूर : 'सारथी'चे निबंधक अशोक पाटील यांचे ग्रंथभेट देऊन स्वागत करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था अर्थात 'सारथी'चे निबंधक अशोक पाटील यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची सदिच्छा भेट घेतली. ग्रंथभेट देऊन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी त्यांचे स्वागत केले. अपर जिल्हाधिकारी असलेले पाटील हे मूळचे अंबप-पाडळी (ता. हातकणंगले) येथील आहेत. 'सारथी'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे अनेक उपक्रम राबवण्याचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले.

'सारथी'च्या योजनेतून ५३ विद्यार्थी केंद्रीय सेवा आयोगाची मुख्य परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. शंभर विद्यार्थ्यांना पीएच.डी.साठी फेलोशिप देण्यात येत आहे. पोलीस भरतीसाठी इच्छुक असलेल्या ५००० उमेदवारांना ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात येणार आहे. दोन हजार विद्यार्थ्यांना कौशल्य विकासासाठी तीन महिन्यांचे अभ्यासक्रम राबवण्यात येणार आहेत. बहुजन समाजातील अनेक होतकरू विद्यार्थी त्यामुळे शिक्षण आणि नोकरीच्या प्रवाहात सामील होऊ शकतील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

'सारथी'च्या विविध उपक्रमांचा लाभ आपल्या विद्यार्थ्यांना मिळवून देण्यासाठी शिवाजी विद्यापीठ सुरुवातीपासूनच प्रयत्नशील आहे, असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. यावेळी डॉ. ए. डी. जाधव उपस्थित होते.

09 APR 2021
तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सारथीच्या निबंधकांची विद्यापीठास सदिच्छा भेट

प्रतिनिधी
कोल्हापूर

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था अर्थात 'सारथी'चे निबंधक अशोक पाटील यांनी विद्यापीठाला सदिच्छा भेट दिली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी ग्रंथभेट देवून स्वागत केले.

अपर जिल्हाधिकारी असलेले पाटील हे मूळचे अंबप–पाडळी

## कौशल्य विकासाचे कार्यक्रम राबवणार

(ता. हातकणंगले) येथील असून 'सारथी'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे अनेक उपक्रम राबविण्याचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले. 'सारथी'च्या योजनेतून ५३ विद्यार्थी केंद्रीय सेवा आयोगाची मुख्य परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. शंभर विद्यार्थ्यांना पीएच. डी. साठी फेलोशीप देण्यात येत आहे. पोलीस भरतीसाठी इच्छुक असलेल्या ५ हजार उमेदवारांना ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात येणार आहे. 'सारथी'तर्फे राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांचा लाभ आपल्या विद्यार्थ्यांना मिळवून देण्यासाठी शिवाजी विद्यापीठ सुरवातीपासूनच प्रयत्नशील आहे, असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. या वेळी प्राणिशास्त्र अधिविभागातील डॉ. ए. डी. जाधव उपस्थित होते.

# पोलिस भरतीसाठी ऑनलाईन प्रशिक्षण

## 'सारथी'चे निबंधक पाटील; शिवाजी विद्यापीठाला दिली सदिच्छा भेट

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ८ : छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेतर्फे (सारथी) पोलिस भरतीसाठी इच्छुक असलेल्या पाच हजार उमेदवारांना ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात येणार असून, दोन हजार विद्यार्थ्यांना कौशल्य विकासासाठी तीन महिन्यांचे अभ्यासक्रम राबविण्यात येणार आहेत, अशी माहिती 'सारथी'चे निबंधक अशोक पाटील यांनी दिली. त्यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची नुकतीच सदिच्छा भेट घेतली. त्या वेळी



त्यांनी ही माहिती दिली. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी त्यांचे ग्रंथ भेट देऊन स्वागत केले.

अपर जिल्हाधिकारी असलेले श्री. पाटील मूळचे अंबप-पाडळी (ता. हातकणंगले) येथील असून, 'सारथी'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे अनेक उपक्रम राबविण्याचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले.



**कोल्हापूर : छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेचे (सारथी) निबंधक अशोक पाटील यांचे ग्रंथभेट देऊन स्वागत करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.**

'सारथी'च्या योजनेतून ५३ विद्यार्थी केंद्रीय सेवा आयोगाची मुख्य परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. शंभर विद्यार्थ्यांना पीएच.डी.साठी फेलोशिप देण्यात येत आहे. बहुजन समाजातील अनेक होतकरू विद्यार्थी त्यामुळे शिक्षण आणि नोकरीच्या प्रवाहात सामील होऊ शकतील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी 'सारथी'तर्फे राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांचा लाभ विद्यार्थ्यांना मिळवून देण्यासाठी शिवाजी विद्यापीठ सुरवातीपासूनच प्रयत्नशील असून, संयुक्त विद्यमाने विद्यार्थिहिताचे इतरही काही उपक्रम राबविता आले, तर त्यासाठीही विद्यापीठ सकारात्मक आहे, असे सांगितले. या वेळी प्राणिशास्त्र अधिविभागातील डॉ. ए. डी. जाधव उपस्थित होते.

0 9 APR 2021
जनसंपर्क कक्ष
पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दलाई लामा फेलोशिपसाठी डॉ. प्रभू यांची निवड

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स व तंत्रज्ञान अधिविभागात अॅडजंक्ट प्रोफेसर म्हणून कार्यरत असलेले आंतरराष्ट्रीय ख्यातीचे मेंदू शास्त्रज्ञ डॉ. सुबोध प्रभू यांची प्रतिष्ठेच्या दि दलाई लामा फेलोशिपसाठी निवड झाली आहे. 'न्यूरोलॉजिकल को-रिलेट्स ऑफ बुद्धिस्ट फिलॉसॉफी' या विषयावरील शास्त्रीय शोधप्रबंध ते वर्षभरात सादर करतील. त्याचप्रमाणे या विषयावर आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञ व तत्त्वज्ञांच्या समूहासमोर दोन सेमिनारही देतील.



**कोल्हापूर : डॉ. सुबोध प्रभू यांचे अभिनंदन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. विजय फुलारी आदी.**

डॉ. प्रभू यांना प्राप्त झालेल्या या फेलोशिपबद्दल शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले. भारतात परतल्यावर बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी 'बिहेविअरल इकॉनॉमिक्स' विषयाचे सल्लागार म्हणून त्यांनी काम सुरू केले. फ्रान्समधील युनिव्हर्सिटी ऑफ ग्रेनोबल येथील ब्रेनटेक संस्थेत 'ट्रान्सलेशनल थेरपीज' विषयातील संशोधक विद्यार्थ्यांचे सह-मार्गदर्शक म्हणूनही ते काम पाहतात.